KNOWLEDGE FLAME
E-ISSN: 3049-1541
INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY RESEARCH JOURNAL (KF-IMRJ)
(An International Indexed & Peer Reviewed Journal)
https://knowledgeflame.in PRGI Reg. No. MAHMUL/2024/89852

# भारत - नेपाळ संबंध : एक चिकित्सक अभ्यास

**पैठणे रवींद्र दिगंबरराव**
राज्यशास्त्र विभाग,
मत्स्योदरी महाविद्यालय,अंबड

ऐतिहासिक दृष्ट्या बघितल्यास भारत आणि नेपाळ ही राष्ट्रे एकमेकांशी अशा पद्धतीने जुटलेली आहेत की, त्यांच्यामध्ये विभक्तपणा आणता येणार नाही.मात्र एक बाब लक्षात घेण्यासारखी आहे की,भौगोलिक दृष्ट्या ही दोन्ही राष्ट्रे वेगवेगळी आहेत.मात्र दोन्ही राष्ट्रातील संबंध हे अगदी प्राचीन स्वरूपाचे आहे.तर नैसर्गिक दृष्ट्या ही दोन्ही राष्ट्रे अतुट वाटतात.आपणास सामान्यत: ज्ञात आहे की,नेपाळ हे राष्ट्र भारतावर काही बातीत निश्चितच अवलंबून आहे.साहजिकच त्यामुळे दोन्ही राष्ट्रा दरम्यान असलेले राजकीय व आर्थिक संबंध महत्वाचे आहेत.त्यामुळे प्रस्तुत संशोधकास उपरोक्त निकटवर्ती राष्ट्रांचा अभ्यास करायला हवा अशी जान झाली.

**संशोधन अभ्यासाची उद्दीष्टे:**

1) भारत आणि नेपाळच्या ऐतिहासिक संबंधचा अभ्यास करणे.
2) भारत- नेपाळ नैसर्गिक एकरूपतेचा अभ्यास करणे.
3) भारत आणि नेपाळचे राजकीय व सामाजिक हित अभ्यासने.
4) दोन्ही देशातील सांस्कृतिक एकरूपतेचे आकलन करून घेणे.
5) दोन्ही देशातील आंतरक्रीया पाहणे.
6) परस्पर संबंधाचा दोन्ही देशावर होणा-या परिणामांचा अभ्यास करणे. इ.

**संबंधाचा आढावा एक दृष्टिक्षेप:**

भारत आणि नेपाळ या दोन देशाचे भुक्षेत्र परस्परांशी गुंफलेले आहे.त्यामुळे या उभय देशादरम्यान नैसर्गिकदृष्ट्या अतुट असे नाते निर्माण झाले आहे. देशाचे गौरीशंकर,हिमालय आणि एव्हरेस्ट पर्वत सांस्कृतिक दृष्टीने दोन्ही देशांसाठी सन्माननीय आहे. हिमालयातून निघणाऱ्या नद्या नेपाळमधून वाहत येऊन भारतीय सीमेत प्रवेश करतात आणि गंगेशी मिळुन महासागरात लिन होतात. या नद्या कोणत्याही सीमेला मानत नाही.भगवान पशुपतिनाथ बुद्धांचे

जन्मस्थान व सीतेचे माहेर देखील कोणतीही सिमा मानत नाही.हिंदु समाज आणि संस्कृतीचे महापुरूष सिमातीत आहेत.भावनात्मक स्वरूपात ते सत्य आहे.परंतु राजकीय नकाशात भारत आणि नेपाळ सार्वभौम संपन्न अशी दोन राष्ट्रे आहेत.

भारत आणि नेपाळ संबंधाचा इतिहास खूप जुना आहे.निसर्गाने नेपाळला एक आशी स्थिती प्रदान केली आहे की, तो भारतापासून प्रथक किंवा वेगळा होऊ शकत नाही.तिन्ही बाजूला बर्फाच्या अतूट आणि अजय शृंखला आणि दक्षिणेच्या बाजूला भारत. नेपाळ चारही बाजूने बंद देश आहे, ज्याच्या जवळ जमिनी व जलमार्ग फारसे नाही तसेच आकाश सुद्धा फारसे स्वतंत्र नाही. नैसर्गिक दृष्ट्या नेपाळ भारतावर अवलंबून आहे.नेपाळ हा देश अतिशय संवेदनशील अशा नाजुक परिस्थिती श्रेत्रात येतो जो की,भुकंप आणि महापूर याने ग्रस्त आहे.त्यामुळे तेथे जीवित आणि वित्तीय हानि मोठ्या प्रमाणात होते.आशावेळी भारत नेहमीच नेपाळला मदत करतो.त्याअनुशंगाने नेपाळ भारतीय मानवतावादी साहाय्यतेचा प्राप्तकर्ता देश आहे.

सन 1950 च्या तह पत्रांनुसार असे ठरविण्यात आले की,भारत व नेपाळ या दोन्ही देशांच्या सुरक्षेला इतरांकडून निर्माण होणारा धोका दोन्ही देश सहन करणार नाही तसेच दोन्ही देशादरम्यान एक असे सामंजस्य राहील की, शेजारील कोणत्याही राष्ट्रामध्ये गैरसमज निर्माण होणार नाही व दोन्ही देश एकमेकांप्रती सलोखा कायम राखतील. मात्र जेव्हा भारतात राहणाऱ्या नेपाळ्यांची संख्या वाढली आणि भारताचा नेपाळच्या अर्थव्यवस्थेतील हस्तक्षेप वाढला तेव्हा दोन्ही देशांमध्ये असलेल्या संबंधात वितुष्टपणा निर्माण झाला याशिवाय 1970 च्या मध्यावधीत सिक्कीम प्रश्नावरून नेपाळने भारतावर खुली टीका केली.21 व्या शतकात राजा ज्ञानेंद्रने सत्ता हाती घेतल्यानंतर भारत व नेपाळ यांच्यातील संबंधात मोठीच कटुता निर्माण झाली. नंतर मात्र सण 2008 मध्ये राजा प्रचंड यांनी नेपाळमध्ये लोकशाही स्थापन केल्यानंतर पंतप्रधान या नात्याने त्यांनी भारतास भेट दिली व भारत-नेपाळ नव्या प्रवाहाचा प्रारंभ झाला. त्यांनी डॉ. मनमोहन सिंग आणि परराष्ट्रमंत्री प्रणव मुखर्जी यांची भेट घेऊन नेपाळ साठी नवीन राज्यघटना तयार करणे,मूलभूत संरचना आणि पर्यटन उद्योग यामध्ये गुंतवणूक करण्यास आग्रह केला. यातुन दोन्ही देशा दरम्यान 1950 च्या शांती व मैत्रीतहाच्या अद्यावतीकरण्यासाठी 22 मुद्दे असलेला जाहीरनामा काढण्यात आला. भारत नेपाळला 150 कोटी रुपयांची पत पुरवेल असे ठरले.तर वर्ष 2010 मध्ये भारताने 250 मिलियन मिलीयन अमेरिकन डॉलर व 80 हजार टन खाद्य त्यांना पुरवले. 2011 पासून भारत नेपाळसह एक सैनिकी अभ्यास करतो ज्यास " सुर्य किरण " या नावाने ओळखले जाते.हा सुरक्षा सहकार्याच्या संबंधाचा एक भाग आहे.व्यापाराच्या दृष्टीने नेपाळ भारताचा सगळ्यात मोठा व्यापाराचा व विदेशी गुंतवणूकीचा भागीदार बनला. सन 2018 - 19 मध्ये या दोन देशात एकूण द्विपक्षीय व्यापार 57858 करोड रूपये पर्यंत

पोहचला.याच वर्षातील भारतात नेपाळची निर्यात 3558 करोड रूपये तर भारताची नेपाळ मधिल निर्यात 54300 करोड रूपये पर्यंत पोहचली.

वरील बाबी लक्षात घेता भारत व नेपाळ या दोन्ही देशा दरम्यान राजकीय व आर्थिक संबंध सलोख्याचे व परस्परावलंबी असल्याचे आढळून येते.यासह या दोन देशादरम्यान सांस्कृतिक संबंधही आढळतात,भारताने काठमांडू- वाराणसी , लुंबिया - बौध्दगया आणि जनकपुर - अयोध्या यांना जोडण्याकरिता तीन ' सिस्टर सिटी ' करारावर स्वाक्षरी केलेलीआहे.हे करार सांस्कृतिक संबंधाची साक्ष देतात. तसेच भारतीय उत्तराखंड,उत्तरप्रदेश ,पश्चिमबंगाल,सिक्कीम आणि बिहार या पाच राज्यांच्या सीमा नेपाळच्या सिमेलगत येतात त्यामुळेही या दोन देशातील सांस्कृतिक व आर्थिक देवाण - घेवाणीचा हा महत्त्वपूर्ण बिंदू या देशामध्ये आहे.

भारतारताचे नेपाळशी संबंध दोन दृष्टीकोनातून महत्वाचे आहे एक म्हणजे की,आंतरराष्ट्रीय राजकारणात भारताच्या भूमिकेत त्याचे स्थान आहे व भारताच्या राष्ट्रीय सुरक्षेसाठी नेपाळ चीनच्या कोणत्याही संभाव्य आक्रमणात ' बफर स्टेट 'म्हणून कार्य करते.कारण नेपाळ हा देश हिमालय सीमेच्या रूपात मध्यभागी आहे.व भुतान सोबत उत्तरी सीमेच्या रूपात येतो.दुसरे म्हणजे अनेक हिंदू आणि बौध्द धार्मिक ठिकाणे नेपाळमध्ये आहेत.जे मोठ्या संख्येने भारतींयासाठी महत्वपूर्ण तिर्थस्थान आहे.

राज्यशास्त्राचा विचार करतांना मनात असा विचार आला की,जवळच्या राष्ट्रांचा राजकीय व आर्थिक दृष्टीने अभ्यास केला पाहिजे. त्यामुळे संशोधन पेपर साठी संशोधकाने या विषयाची निवड केली होती.

**संदर्भग्रंथ सूची**


1) डॉ. शांताराम भोगले - भारताचे परराष्ट्र धोरण.

2) उपाध्याय श्रीरामजी - नेपाल का इतिहास दिग्दर्शन,बनारस 1950.

3) Za V.K. - Indo - Nepal Relation,Vora & Co.,Bombay,1973.

4) Gupta Anirudha - Politcs in Nepal,Asia publishing House,Bombay,1964.

5) Agrawal H.M. - The Administrative system of Nepal, New Dhlhi.